# ॲटम् बॉंब्

## पोवाडा —— :30:

### ( ॲटम् बॉंब्चें आत्मवृत्त )

माझं नांव ॲटम् बॉंब् । जगीं झाली बोंबाबोंब । उठले आगीचे हे डोंब । जळले झाडांचेही कोंब । लाखो जीव मेले भूवरी । लाजेची गोष्ट ही खरी । धडकी ज्याच्या त्याच्या अंतरीं । परि नसे माझा दोष । विजयाची ज्यांना आस । त्यांनीं केला सत्यानास। मला धरून वेठीस । धिक्कार त्यांचा मी करी ॥ १ ॥ शक्ति माझी अमर्याद । नव्हती कोणालाही दाद । परी घेतला मी छंद। द्याया जगाला आनंद। व्हावं आतां प्रगट भूतलीं ॥ सुख सर्वांना देऊन। दुःख नाहींसं करून । नंदनवन मी करीन । अशी आशा होती अंतरीं ॥ शास्त्रज्ञांना बोलावून । प्रयोगशाळेंत नेऊन । त्यांना बोल्लों आवर्जून । " शास्त्रज्ञांनो, घ्या ऐकून । माझा उपयोग करून । सुखी करा माणूस लौकरी ॥ २ ॥ माझं अणुएवढं अंग । परि शक्ति हो अभंग । माझ्या शक्तीला ना भंग । प्रतिज्ञा माझी ही खरी । अणुएवढं यूरेनियम। त्यांत पदार्थ घालून। मला ठेवावं कोंडून ॥ चाल ॥ मग माझी शक्ति पुढं दिसेल खास तुम्हाला ॥ अणु एवढी शक्ति पुरे सारं जग जाळण्याला ॥ म्हणून चांगला उपयोग करा । जमीन खोदून कालवे खणण्याला । डोंगरांचें मैदान करण्याला । समुद्राची जमीन करण्याला । जमिनीचा दरिया करण्याला । वातावरण तापवून देण्याला । अणुएवढी शक्ति माझी बस्स होईल सर्वाला ॥ शक्तिचा उपयोग छान करा । सुखी करा साऱ्या विश्वाला " ॥ चाल ॥ असं बोल्लों शास्त्रज्ञास । यत्न केला रात्रंदीस । आला प्रयत्न फळास ।

जर्मनीतनं नेलं खास। अमेरिकेच्या खंडास। हिटलरच्या जर हातास। लागलों असतों मी हो खास। तर जगाचा विनाश। असं वाटलं शास्त्रज्ञांस। म्हणून त्यांनीं नेलं लौकरी ॥ ३ ॥ अमेरिकेचे ते लोक। लोकशाहीचा हो शोक। त्यांचा चांगला लौकीक ॥ चाल ॥ म्हणून मला वाटलं त्या वेळा। माझा उपयोग करतील बरा। शास्त्रज्ञ बोलले अध्यक्षाला। अणुशक्ति आली हाताला। एक अणु विश्वाचा अंत करिल हो बोला ॥ पण तोच जर चांगल्या कामीं लावला। तर विश्वांत सौख्य वाढेल, करू काय बोला " ॥ अमेरिकेचा अध्यक्ष शास्त्रज्ञाला बोलला। ' तुम्ही म्हणतां संहार करण्याचीं अणुशक्ति आली हाताला। तर असा एक बॉंब करा कीं जो जास्तींत जास्त नाश करणारा झाला। तरच तुमचं म्हणणं खरं वाटेल मला " । शास्त्रज्ञांनीं नारिंगाएवढा गोल एक केला। त्यांत भरून ठेवलं त्यानं मला। ॲटम बॉंब रूपानं तंवा आलों जन्माला ॥ जपान्यांचा नाश करण्याला। एके दिवशीं विमानांत घालून नेलं हो मला ॥ होरोशिमो बेटावर हळूंच टाकलं मला ॥ जी ॥ तों मोठा संहार झाला। होरोशिमो बेटाचा चक्काचूर जाहला ॥ हज्जारों भाजून मेला। झाडंझुडपं झालीं चोळागोळा। पटापट पक्षी किती मरून पडले भूमिला। लहान मुलं बायका ही किती जळल्या त्या वेळा ॥ जी ॥ नागासाकी बंदरावर पुन्हां सोडलं त्यांनीं मला ॥ तंवा तिथं हाहाकार झाला। तंवा फार वाईट वाटलं हो मला। प्रगट झालों सुख देण्याला। पण दिला मृत्यु कितिकांला। एक गोष्ट गेलों करायला। पण झालं दुसरंच या वेळा। तंवा मी विचारलं शास्त्रज्ञाला। " अरे माझं नांव तरी काय ते सांग मला " । तंवा शास्त्रज्ञ बोलला। " ॲटम बॉंब नांव तुझं ठेवलंय, धाक सर्वांला ॥ ४ ॥

रचना- १२-११-४९.